क्विक Update

शिक्षक वैभव भोसले यांना राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार



आष्टी : शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य, नावीन्यपूर्ण उपक्रमांची दखल घेत येथील गणेश विद्यालयाचे शिक्षक वैभव आसाराजी भोसले यांना बीडच्या गैप्रा फाउंडेशनच्या वतीने २०२६ चा 'शिक्षण महर्षी' राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष द. ल. वारे यांनी पत्राद्वारे ही घोषणा केली. रविवार, ९ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता बीड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनात पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे.

मिनी ट्रॅक्टरसाठी मिळणार अनुदान



बीड : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील स्वयंसहायता बचतगटांना ९० टक्के अनुदानावर मिनी ट्रॅक्टर व उपसाधने पुरविण्याच्या योजनेसाठी ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे आता शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून, या योजनेचा लाभ घेता येणार आहे. ज्या शेतकऱ्यांकडे पैसे आहेत त्यांना ट्रॅक्टर घेता येणार आहे. ३ लाख ५० हजार रुपयांच्या मर्यादेत ९० टक्के शासकीय अनुदान (३.१५ लाख रुपये) तर १० टक्के स्व-हिस्सा (३५ हजार रुपये) असणार आहे. नोंदणीकृत बचतगटात किमान ८० टक्के सदस्य अनुसूचित जाती प्रवर्गातील असावेत. ग्राम बचतगटांनी वेळेत अर्ज करण्यावे सवाहन समाजकल्याण सहायक युक्त प्रदीप भोगले यांनी केले आहे.

दिव्यांगांसाठी शासनाने उघडली दारे; आमदारांनीही सोडला मोकळा हात

दिव्यांगासाठी तीनचाकी सायकली, कर्णबधिरांसाठी श्रवणयंत्रे, दृष्टिहीनांसाठी विशेष साधने

लोकमत न्यूज नेटवर्क

बीड : आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील दिव्यांगांना सक्षम करण्यासाठी आणि त्यांना आवश्यक ती साधने उपलब्ध करून देण्यासाठी भरीव मदत केली जात आहे. शासनाच्या नियमानुसार आमदार निधीतून दिव्यांगांच्या कल्याणासाठी दरवर्षी विशेष तरतूद करण्यात येते. बीड जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींकडून या निधीचा नियमित व योग्य वापर केला जात असून, जिल्हा नियोजन विभागाच्या माहितीनुसार जिल्ह्यातील आमदारांनी दिव्यांगांच्या मदतीसाठी नेहमीच मोकळा हात सोडल्याचे चित्र आहे.

> **जिल्ह्यातील सर्वच आमदार दिव्यांगांच्या कल्याणासाठी निश्चित केलेला निधी नियमितपणे खर्च करीत आहेत. निधी खर्च केला नाही किंवा तरतूद केली नाही, असे एकही आमदार जिल्ह्यात नाही.**
>
> **शिला मिसाळ,** जिल्हा नियोजन अधिकारी, बीड



आमदार निधीतून ३० लाखांची तरतूद

आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत दिव्यांगांसाठी व्हीलचेअर, तीनचाकी सायकल, श्रवणयंत्र, कृत्रिम अवयव यांसारख्या आवश्यक साहित्याची खरेदी करण्यासाठी विशेष निधीची तरतूद आहे. यासाठी प्रत्येक आमदाराला त्यांच्या स्थानिक विकास निधीतून दरवर्षी कमाल ३० लाख रुपयांपर्यंतचा निधी प्रस्तावित करता येतो.

काय आहेत शासनाचे दिशानिर्देश?

राज्य शासनाच्या नियमानुसार, आमदारांना मिळणाऱ्या वार्षिक निधीतील विशिष्ट रक्कम (दरवर्षी ५० टक्के किंवा कमाल ३० लाख रुपये) ही केवळ दिव्यांगांच्या कल्याणकारी योजना आणि साहित्य वाटपासाठीच राखीव ठेवणे बंधनकारक आहे. या निधीचा वापर इतर कोणत्याही कारणासाठी करता येत नाही.

खर्च झालेला निधी

जिल्हा नियोजन समितीकडून मिळालेल्या माहितीनुसार, प्रत्येक वर्षी एकूण आमदार निधीच्या १० टक्के निधी या घटकासाठी राखीव असतो. जिल्ह्यातील सर्वच आमदारांकडून हा निधी नियमितपणे आणि पूर्ण क्षमतेने खर्च केला जात असून, गरजू दिव्यांगांपर्यंत मदत पोहोचवली जात आहे.



निधी मिळवण्याची प्रक्रिया

गरजू दिव्यांग व्यक्तीने किंवा संस्थेने आमदारांकडे किंवा जिल्हा नियोजन समितीकडे मागणी अर्ज सादर करावा.

अर्जासोबत ४० टक्क्यांपेक्षा जास्त अपंगत्वाचा दाखला, आधार कार्ड व रहिवासी पुरावा जोडणे आवश्यक आहे.

आमदारांच्या शिफारशीनंतर जिल्हा नियोजन समिती मार्फत तांत्रिक मंजुरी मिळून साहित्य किंवा मदत उपलब्ध करून दिली जाते.

कोणकोणत्या गोष्टींसाठी आहे तरतूद?

१. दिव्यांगांसाठी तीनचाकी सायकली व मोटारइज्ड व्हीलचेअर
२. श्रवणयंत्रे (हियरिंग एड्स) आणि दृष्टिहीनांसाठी विशेष साधने
३. कृत्रिम अवयव व कॅलिपर्स वाटप
४. दिव्यांग व्यक्तींसाठी स्वयंरोजगाराची साधने व साहित्य खरेदी

फोटो Stories



धारूरमध्ये प्रहार संघटनेच्या शाखेचे उद्घाटन

धारूर : शहरातील पोस्ट ऑफिस रोड, हनुमान चौक येथे प्रहार संघटनेच्या शाखेचे उद्घाटन तालुकाध्यक्ष हनुमंत तोंडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नवीन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. नितीन गोंदने यांची शाखाप्रमुखपदी, महादेव शिर्के यांची शाखा उपाध्यक्षपदी तर चंद्रकांत मधुरकर यांची शाखा सचिवपदी नेमणूक करण्यात आली. यावेळी उद्घाटन कार्यक्रमास प्रमोद देशपांडे, लिंबाजी शिनगारे, बाबासाहेब झिंजुर्डे, भगवान तट्टू, पांडुरंग सातपुते, ज्ञानदीप शिनगारे, परमेश्वर हॅडिबांग, गफारखान, महादेव शिर्के, सुदाम शिर्के, चंदू चव्हाण, चंदू मधुरकर, अशोक गायकवाड, राजू शिंदे आणि संतोष गोंदणे आदी उपस्थित होते.



परशुराम संस्कार सेवा संघाचे कुमारीका पूजन

बीड : परशुराम संस्कार सेवा संघ महिला पदाधिका-यांच्या वतीने नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने बीड शहरात कुमारिका पूजन करण्यात आले. यावेळेस परशुराम संस्कार सेवा संघाच्या महिला प्रदेशाध्यक्षा मंगला आगतान, प्रदेश उपाध्यक्षा सुषमा चिगळे,प्रदेश सचिव अमृता जोशी, जिल्हाध्यक्षा अर्चना जोशी, प्रदेश संघटक मंगला कैंडे आदी महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.

२ वर्षांपूर्वीच ठरले दर, नियम अन् निधी; गाळ उपसा कसा होणार ?

गाळ काढण्यासाठी घनमीटरमागे ३५ रुपये

एजाज अहमद
लोकमत न्यूज नेटवर्क

बीड : यंदा दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर धरणांमधील गाळ काढून पाणीसाठ्याची क्षमता वाढविण्यासह शेतजमिनीची सुपीकता सुधारण्यासाठी राज्य शासनाने 'गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार' आणि 'नाला खोलीकरण व रुंदीकरण' या योजना राबविण्याचा निर्णय घेतला. यावर पावसापूर्वी म्हणजे बहुदा एप्रिलनंतरच अंमलबजावणी होणार आहे. सध्या गाळपेऱ्यास प्रथम प्राधान्य देण्यात येत आहे. जनावरांसाठी मुबलक चारा उपलब्ध व्हावा यामागचा उद्देश आहे. मात्र गाळ उपशाचे दर, शेतकऱ्यांना अनुदान आणि कामांचे निकष दोन वर्षांपूर्वीच निश्चित केले गेले. सध्या महागाईचा आगडोंब उसळलेला असून यंत्रसामग्रीचे भाडे व डिझेलचेही दर वाढलेले असताना २०२६ मध्ये जुन्याच दरात शेतकऱ्यांना परवडणार कसे, असा सवाल उपस्थित होत आहे.

१५ हजार रुपये एकरी अनुदान शेतकऱ्यांना

राज्य शासनाने १५ ऑक्टोबर २०२४ रोजी 'गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार' आणि 'नाला खोलीकरण व रुंदीकरण' या योजना कायमस्वरूपी राबविण्याचा निर्णय घेतला. पुढील पाच वर्षांसाठी २ हजार ६०४ कोटी रुपयांच्या खर्चासही मान्यता देण्यात आली. गाळ उपसा आणि नाला खोलीकरणासाठी यंत्रसामग्री व इंधनाचा खर्च प्रतिघनमीटर ३५ रुपये निश्चित करण्यात आला आहे. हा दर २०२२-२३ च्या सामाईक दरसूचीवर आधारित आहे. दरसूचीत बदल झाल्यास सुधारित दर लागू करण्याची तरतूदही शासन निर्णयात आहे. गाळ शेतात वाहून नेणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना प्रतिघनमीटर ३५.७५ रुपये दराने अनुदान देण्याची तरतूद आहे. प्रति एकर कमाल १५ हजार रुपये, तर अडीच एकरांसाठी ७७ हजार ५०० रुपयांपर्यंत अनुदान देय आहे.

जुन्या जलसाठ्यांना प्राधान्य देण्याची तरतूद

दहा वर्षांपेक्षा जुन्या जलसाठ्यांतील गाळ काढण्यावर भर देण्यात येणार आहे. ६०० हेक्टरपेक्षा कमी लाभक्षेत्र असलेल्या मृद व जलसंधारण विभागाच्या जलसाठ्यांना प्राधान्य देण्याची तरतूद आहे. ग्रामपंचायतीचा ठराव, प्रकल्प अहवाल, तांत्रिक मान्यता आणि प्रशासकीय मंजुरीनंतर कामे हाती घेण्याची प्रक्रिया निश्चित होणार आहे. रुपयांपर्यंत अनुदान मिळू शकते. अत्यल्पभूधारक, अल्पभूधारक तसेच विधवा, दिव्यांग आणि आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांतील पात्र लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात येणार आहे.



> **सध्या इंधन, जेसीबी व पोकलेन यंत्राचे भाडे, ट्रॅक्टर वाहतुकीचा आणि वाहतूक खर्च वाढल्याने सध्याचे अनुदान अपुरे असून गाळमुक्त धरण आणि गाळयुक्त शिवार योजनेतील अनुदानात वाढ करावी आणि दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा द्यावा.**
>
> **डॉ. गणेश ढवळे,** सामाजिक कार्यकर्ते, बीड

पती-पत्नीस मारहाण करून धमकावले

लोकमत न्यूज नेटवर्क

बीड : जुन्या वादातून पत्नीला मारहाण होत असताना तिला सोडविण्यासाठी गेलेल्या पतीलाही काठीने मारहाण करून जखमी केल्याची घटना २१ ऑक्टोबर रोजी दुपारी मानकुरवाडी (ता. बीड) येथे घडली. याप्रकरणी ज्ञानेश्वर आत्माराम जाधव (वय २६, रा. मानकुरवाडी) यांच्या फिर्यादीवरून पिंपळनेर पोलिस ठाण्यात संगीता जाधव, गंगुबाई जाधव द्वोघी रा. मानकुरवाडी, पिनू रमेश चव्हाण व रमेश चव्हाण (दो रा. वारुळा तांडा, ता. माजलगा यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण आला आहे.

मस्ट READ

२८ विद्यार्थ्यांवर टंग टायच्या शस्त्रक्रिया

लोकमत न्यूज नेटवर्क

गेवराई : राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाच्या अंतर्गत गेवराई तालुक्यातील २६ विद्यार्थ्यांवर टंग-टाय व इतर २ विद्यार्थ्यांवर मंगळवारी जिल्हा रुग्णालयात यशस्वी शस्त्रक्रिया पार पडल्या आल्या.

तालुकास्तरीय शालेय आरोग्य पथकाने नुकत्याच शाळा आणि अंगणवाड्यांमधील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केल्यानंतर टंग-टाय चे रुग्ण आढळले होते. त्यामुळे शालेय आरोग्य पथकाच्या प्रयत्नांमुळे हे विद्यार्थी मोफत शस्त्रक्रियासेवा घेऊ शकले. या शस्त्रक्रियांचे नियोजन जिल्हा रुग्णालयातील सर्जन डॉ. राहुल दुबाले यांनी केले. खासगी रुग्णालयात या शस्त्रक्रियांना हजारो रुपयांचा खर्च आला असता. परंतु, उपजिल्हा रुग्णालयात या शस्त्रक्रिया मोफत झाल्याने पालकांचा मोठा आर्थिक भार टळला. यावेळी उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. विजय कुठे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अभय गौंदीकर, शालेय आरोग्य पथकातील नोडल अधिकारी डॉ. राजू आंधळे आदी उपस्थित होते.



राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत गेवराई उपजिल्हा रुग्णालयात २८ शालेय विद्यार्थ्यांवर टंग टायच्या शस्त्रक्रिया झाल्या.

ष्टी भांडेकर चित्रकला र्धेत जिल्ह्यात प्रथम

लोकमत न्यूज नेटवर्क



भांडेकर

शिरूर कासार : येथील नगरपंचायतीचे गटनेते गणेश भांडेकर यांची कन्या सृष्टी भांडेकर ही आयडीएल इंग्लिश स्कूलमध्ये आठवीत शिक्षण घेत असून तीने चित्रकला स्पर्धेत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.

महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबईच्या बाल चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या. त्यात सृष्टी भांडेकर तिने भाग जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवला आहे.तिच्या यशाबद्दल कासार चे अध्यक्ष शरदजी भांडेकर, माजी नगराध्यक्ष रोहीदास पाटील, राध्यक्ष प्रकाश देसारडा, माजी नगराध्यक्ष दत्ता पाटील, नगरसेवक श तांदळे यांनी कौतुक केले आहे.

State Bank of India

REGIONAL BUSINESS OFFICE BEED
HINA HIGHTS, JALNA ROAD, BEED 431122

REQUIREMENT OF COMMERCIAL / OFFICE PREMISES FOR KILLE DHARUR BRANCH OF SBI

State Bank of India, invite offers from owners/ power of attorney holders for commercial / office premises on lease Rental basis for its **Kille Dharur Branch** (20032). For further details and downloading Tender Document please visit Bank's website www.sbi.co.in under the important link 'Procurement and others' from 22.10.2026 to 05.11.2026. The last date for submission of offers at our Regional Business Office Beed will be on or before 3:00 pm on 05.11.2026. Further Notice / Clarification in this regard will be posted only on the Banks above mentioned website.

No brokers please.

ASISTANT GENERAL MANAGER

भारतीय स्टेट बँक

य व्यवसाय कार्यालय, बीड हिना हाइट्स, जालना रोड, बीड 431122

एसबीआई की किल्ले धारुर शाखा के लिए मर्शियल / कार्यालय परिसर की आवश्यकता

रतीय स्टेट बैंक की ओर से किल्ले धारुर शाखा (20032) के ट्टे किराया आधार पर कमर्शियल / कार्यालय परिसर हेतु, मालकी / ऑफ एर्टार्नी धारकों से निविदाये आमंत्रित की जाती है । अन्य ों तथा निविदा कागजात डाऊनलोड करने हेतु कृपया बैंक की ट www.sbi.co.in पर लिंक 'प्रॉक्यूरमेंट अँड अदर्स' के 22.10.2026 से 05.11.2026 के बीच लॉगिन करे. क्षेत्रीय

भारतीय स्टेट बँक

क्षेत्रीय व्यवसाय कार्यालय, बीड हिना हाइट्स, जालना रोड, बीड 431122

एसबीआयच्या किल्ले धारुर शाखेसाठी व्यावसायिक / कार्यालय संकुलाची आवश्यकता

भारतीय स्टेट बँक किल्ले धारुर शाखेसाठी (20032) भाडेतत्वावर व्यावसायिक / कार्यालयीन जागेसाठी मालकी / पॉवर ऑफ ॲटर्नी धारकांकडून निविदा मागवत आहे. इतर तपशील आणि निविदा कागदपत्रे डाउनलोड करण्यासाठी, कृपया 'खरेदी आणि इतर' (Procurement and others) दुव्याखाली www.sbi.co.in बँकेच्या वेबसाइट ला 22.10.2026 ते 05.11.2026

महाराष्ट्र ग्रामीण बँक
MAHARASHTRA GRAMIN BANK
(सार्वजनिक क्षेत्रातील राष्ट्रकृत बँक Scheduled Bank Owned by Government)

ई-लिलाव व विक्री सूचना

मुख्य कार्यालय : प्लॉट क्र. ४२, गट क्र. ३३,(भाग), गोलवाडी गाव, ड्रीम सेंटर, शाकुन महानगर -IV, सिडको, छ. संभाजीनगर. -४३११३६.
क्षेत्रीय कार्यालय : बीड

सेक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट कायदा - २००२ तहत ई-ऑक्शन द्वारे (ऑनलाईन विक्री) मिळकती जाहीर सूचना तथा. कर्जदार / जामीनदारांस सूचना
सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ (यापुढे नियम असे संबोधनाचा येईल) सह शाखाधारे बँकास प्राधिकृत अधिकारी म्हणून सदर सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ (यापुढे नियम असे संबोधनाचा येईल) सह शाखाधारे बँकास प्राधिकृत अधिकारी म्हणून सदर कायदा २००२ तहत प्रदान अधिकारांचा/ अंमलबजावणीसाठी आणि खालील कर्जदार / तारणकर्ता यांचे संबंधित मालमत्तेचा ताबा घेतलेला आहे. खालील नमूद मालमत्तेच्या खरेदीसाठी बँकेकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. त्यापुढे, बँकेचे प्राधिकृत अधिकारी यांनी उपरोक्त कायद्याचे नियम ८ व ९ नुसार खालील मालमत्ता 'जशी आहे जेथे आहे तशी' व 'जी काय आहे तशी' या तत्त्वावर ऑनलाईन जाहीर लिलावाद्वारे विक्री करण्याचे ठरविले आहे. महाराष्ट्र ग्रामीण बँक हे संस्थेला कमकुवत आहेत, त्यापुढे कर्जदाराचे / थाणीदाराचे इतर कोणत्याही ऋणकोचे प्रलंबित वाद हे लिलावद्वारे खरेदी केलेल्या मिळकतीमध्ये तसेच खरेदीदाराचे हक्क यास प्रभावित करू शकणार नाहीत. तसेच विक्री करण्यात येणाऱ्या मालमत्तेवर कोणत्याही कोटीची स्थगिती (Stay) नाही.

मिळकत लॉट क्र.	कर्जदाराचे / जामीनदाराचे नाव व पत्ता, शाखेचे नाव व कर्ज खाते क्र.	मालमत्तेचा तपशील (स्थावर-जंगमेतर)	विक्री केली जाणारी मालमत्तेची राखीव रक्कम	बयानाची किंमत रुपये इसार जमा रक्कम रुपये बोली रक्कमेतील किमान वाढ रुपये	तारीख व वेळ
१	कर्जदार : १. श्री. विनीता प्रविकुन सोळंके, प्रो. श्री विलास जगन्नाथ गोरे मु.पो. पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड जामीनदार : १. श्री सतीश मारुती गोरे मु.पो. पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड २. श्री संतोष द्वारकाधर खंडे, मु. ज्ञानेश्वरवाडी पो. पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड कर्ज खाते क्र. CO0913C415120 मालमत्तेची ऑफर - एन्फरन्स्ड:CO0913C415120	श्री विलास जगन्नाथ गोरे यांच्या, मालकीचा प्लॉट क्र. १६३७/१, क्षेत्रफळ १७५० चौ.फू. ता. ज्ञानेश्वरवाडी, ता. पाटोदा, जि. बीड मधील मौजे पाटोदा येथील मिळकत. चतुःसीमा पूर्व : लगत रहिवास गोरे वस्ती, पश्चिम : मालकाचेच अन्य प्लॉट उत्तर : पेवर ब्लॉक रोड दक्षिण : रस्ता	रु. १४,७१,१८८/- + दि. ३१.१२.२०२५ पासूनचे प्रलंबित व्याज व इतर खर्च	रु. ३२५८१२१/- रु. ३२५८१/- रु. १०००/-	११.११.२०२५
२	कर्जदार : १. देवराज संभाजी मेहता, मु.पो. तेलगाव, ता. पाथरु जि. बीड जामीनदार : १. श्री संजय देवराव मेहता, मु.पो.,तेलगाव, ता. पाथरु जि. बीड. २. श्री परमेश्वर मोहनराव पवेकर, मु.पो. तेलगाव, ता. पाथरु-जि. बीड कर्ज खाते क्र. CO0913A33360 मालमत्तेची ऑफर - एन्फरन्स्ड:CO0913A33360	देवराव संभाजी मेहता यांच्या, मालकीचा ग्रा.प. मिळकत क्र. ५८१(नवीन), २२९(जुना) क्षेत्रफळ ३५०० चौ.फू. मु.पो. तेलगाव, ता. पाथरु, जि. बीड चतु: सीमा : पूर्व: लोखनगाई उपरे पश्चिम : गायलगाव रस्ता उत्तर : अशोक झानोबा दसिंग -जनहुसाचल मेहता	रु.४,१३,०५५+ दि. १७/०४/२०२५ पासूनचे प्रलंबित व्याज व इतर खर्च	रु. २५१३३८३/- रु. २५१३३८/- रु. १०००/-	२६.०१.२०२६
३	कर्जदार : मे. दीपराज किराणा स्टोअर्स, प्रो. सिद्धेश्वर नंदकुमार पटेकर. मु. - गकान शही,पो.हिवरा , ता. गाजलगाव जि. बीड जामीनदार : १. श्री पुरुषी ज्ञानोबा पटेकर. मु. - गकान शही,पो.हिवरा , ता. गाजलगाव जि. बीड २ श्री सुरेश पद्धराव पटेकर मु. गकान शही,पो.हिवरा , ता. गाजलगाव जि. बीड खाता संख्या CO0913C2UBC2 मालमत्तेची ऑफर - एन्फरन्स्ड:CO0913C2UBC2 CO0913A33360	श्री सिद्धेश्वर नंदकुमार पटेकर यांच्या, मालकीचा ग्राम पंचायत घर. क्र. ८५, क्षेत्रफळ ३०५ चौ.फू., मु. - गकान शही,पो.हिवरा , ता. गाजलगाव जि. बीड चौहद्दी :- पूर्व: गतीक जाळमे यी मालपत्रा पश्चिम: रस्ता उत्तर: रस्ता दक्षिण: रमेश पटेकर्ची मालमत्ता	रु. ४,८७,२१९/- + दि. २९.०५.२०२५ पासूनचे प्रलंबित व्याज व इतर खर्च	रु. २००५७०/- रु. २००५७/- रु. १०००/-	२३.०२.२०२६
४	कर्जदार : १. श्री पांडुरंग बाबुराव पांचाळ, मु. मोरेवाडी, ता. अंबाजोगाई जि. बीड जामीनदार : १. श्री बबासो पण्डवानाथ गोरे, मु. मोरेवाडी, ता. अंबाजोगाई जि. बीड २. श्री अरुण नारायणराव पांचाळ, मु.पो.मोरेवाडी, ता. अंबाजोगाई जि. बीड खाता संख्या- CO0918C1UY8C मालमत्तेची ऑफर - एन्फरन्स्ड:CO0918C1UY8C	श्री पांडुरंग बाबुराव पांचाळ यांच्या, मालकीचा (एम.पी.) ग्रा.प. घर क्र. ३/२, क्षेत्रफळ ८४० चौ.फू., मु.पो. मोरेवाडी, ता. अंबाजोगाई, जि. बीड चतु: सीमा : पूर्व: अरुण नारायण मोरे पश्चिम: भोलीराम मोरे, मोरेवाडी उत्तर: रस्ता दक्षिण : पांडुरंग बाबुराव पांचाळ	रु.३,११,९२७/- + दि. २१.०३.२०२५ पासूनचे प्रलंबित व्याज व इतर खर्च	रु. ४८१९००/- रु. ४८१९०/- रु. १०००/-	०२.०१.२०२६

ठेवायची व अनामत रक्कम जमा करण्याचा दिनांक व वेळ : २५/११/२०२५ ; सायंकाळी ५:०० पर्यंत
मालमत्ता निरीक्षणाचा दिनांक व वेळ : २३/११/२०२६; सायंकाळी- ५:०० पर्यंत
लिलावाचा दिनांक व वेळ (५ मिनिटांच्या याद्रीय वेढेनुसार, जर शेवटच्या ५ मिनिटांत बोली लावली असेल तर) : २६/११/२०२६ : सकाळी ११:०० ते दुपारी १:३० पर्यंत

अटी व शर्ती –

१) लिलाव ऑनलाइन पद्धतीने https://baanknet.com या संकेतस्थळावर निश्चित केलेल्या दिवशी होईल. शेवटच्या ५ मिनिटांत बोली आल्यास लिलाव आपोआप ५ मिनिटांनी वाढवला जाईल.

२) बोलीदारांनी https://baanknet.com या वेबसाईटवर नोंदणी करावी लागेल आणि अनामत रक्कम (Earnest Money Deposit) लिलावा आधी भरावी लागेल. ही रक्कम बँकेकडे जमा होऊन वेबसाईटवर अपडेट होईपर्यंत थोडा वेळ लागू शकतो. म्हणून लिलावाच्या कमीत कमी २४ तास आधी अनामत रक्कम भरावी.

३) सविस्तर अटी व शर्तींसाठी महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या वेबसाईटवर व https://baanknet.com या वेबसाईटवर दिलेल्या लिंक्स बघाव्यात. तसेच पुढील अधिकार्यांशी संपर्क साधावा: १) श्री. हर्षल ग. कुहांडे, अधिकृत अधिकारी/क्षेत्रीय व्यवस्थापक, महाराष्ट्र ग्रामीण बँक, बीड. मोबाइल क्रं. ९४२७७४५९२४, ईमेल: rmlatur@mahagramin.co.in २) आकाश जाधव, शाखा व्यवस्थापक, मोरेवाडी शाखा, मोबाईल: ९९६०३१६१०२, ३) श्री. सचिन एम. पवार, वसुली अधिकारी, मोबाइल क्रं. ८८०५९१६६८६, ४) श्री. उदय जाधव, मोबाईल क्रं. ९८२०८७८२५५ ईमेल: uday.jadhav@psballiance.com ५) हेल्पलाइन क्रं. ८२९१२२०२२० आणि ईमेल: support.baanknet@psballiance.com.

४) प्रशस्ती बोलीदारास खरेदी रक्कमेपैकी २५% (अनामत रक्कम सहित) रक्कम लगेच जमा करावी लागेल आणि उरलेली रक्कम १५ दिवसांच्या आत भरावी लागेल.

५) बोली आरक्षित किमतीपेक्षा जास्त असावी आणि पुढील बोली किमान रू. १०,००० च्या पटीत वाढवावी लागेल.

६) ज्या बोलीदारांची बोली यशस्वी ठरलेली नाही, अशा बोलीदारांचा अनामत ठेव रकम लिलाव प्रक्रिया संपल्या नंतर परत केली जाईल.

७) लिलाव बँकेच्या मंजूरीवर अवलंबून आहे. कर्जदाराने बँकेकडे पूर्ण थकबाकी भरल्यास लिलाव रद्द केला जाऊ शकतो.

८) मालमत्ता जशी आहे तशी आणि जे आहे ते या तत्त्वावर विकली आहे. बोलीदारांनी मालमत्तेबाबत स्वत: चौकशी करावी, त्यावरील कोणतेही दावा / खर्च बँकेशिवाय असतील त